म० प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

पोलीस स्टेशन क्रांती चौक, औरंगाबाद शहर

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद शहर **P.S.(ठाणे):** क्रांति चौक

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0298 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 21/09/2023 01:18

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार
   **Time Period (कालावधी):** पहर 6
   **Date From (दिनांक पासून):** 20/09/2023
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 20/09/2023
   **Time From (वेळेपासून):** 18:30 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 18:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 21/09/2023 **Time (वेळ):** 01:18 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 002

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 21/09/2023 01:18 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** वरद गणेश मंदीरा समोरील ,रोडवरील एका चहाच्या टपरीवर ,समर्थनगर छ संभाजीनग

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** भुषण किरण तुपे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1996

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रामालुंजा खुर्द ता गंगापुर ,जि औरंगाबाद,क्रांति चौक,औरंगाबाद शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रामालुंजा खुर्द ता गंगापुर ,जि औरंगाबाद,क्रांति चौक,औरंगाबाद शहर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9860458606

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. दिलीप गमजु गायकवाड | | | 1. प्लट नंबर 5 फ्लट नं 50 , सरस्वती अपार्टमेंट, समर्थनगर, औरंगाबाद,क्रांति चौक, औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 21/09/2023

मी भुषण किरण तुपे, वय 27 वर्षे, व्यवसाय शेती व खाजगी नोकरी, रा.मालुंजा खुर्द. ता. गंगापुर जि. औरंगाबाद. मोबाईल नंबर 9860458606

मी पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद यांना दिनांक 17/09/2023 रोजी मोबाईलद्वारे संपर्क करुन मला आमचे गावाचे ग्रामसेवक श्री.गायकवाड हे लाचेची मागणी करीत असुन मला त्यांचे विरुध्द तक्रार द्यायची असल्याचे सांगीतले. मी औरंगाबाद येथे येऊ शकत नाही. त्यानंतर थोड्याच वेळाने मला श्री. सचिन साळुंखे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद यांनी फोन करून सांगितले की, पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद यांनी मला तुमचा मोबाईल नंबर देवुन तुमच्या तक्रारी प्रमाणे कारवाई करण्याचे आदेश दिले आहे. त्यानंतर श्री.साळुंखे यांना मी माझी तक्रार असल्याचे सांगुन दिनांक 18/09/2023 रोजी गंगापुर येथे येण्याचे सांगितले होते. त्यावरून ते गंगापुर येथे त्यांचे स्टाफ सह हजर आले. तेव्हा त्यांनी त्यांची व त्यांचे सोबतच्या स्टाफची ओळख करुन दिल्यानंतर मी त्यांचे समक्ष तक्रार दिली ती खालील प्रमाणे.

मी समक्ष गंगापुरच्या अलीकडे सुरक्षित ठिकाणी हजर राहुन तक्रार देतो की, मी वरील ठिकाणी परिवारासह राहण्यास असुन शेती व खाजगी नोकरी करतो.

मी दिनांक 15/09/2023 रोजी माझे वडील श्री. किरण नामदेव तुपे यांच्या नावाची रमाई आवास योजने अंतर्गत घरकुल मंजुर होणे बाबतची पुर्ण कागदपत्रांची फाईल आमच्या गावाचे मालुंजा खुर्द येथील ग्रामसेवक श्री. गायकवाड यांच्याकडे दिली होती. त्यानंतर मी दिनांक 17/09/2023 रोजी ग्रामपंचायत कार्यालय मालुंजा खुर्द येथे जावुन ग्रामसेवक श्री.गायकवाड यांची भेट घेवुन माझ्या वडीलांची घरकुल फाईल मंजुर होणे बाबतची चर्चा केली असता, त्यावेळी ग्रामसेवक श्री.गायकवाड हे मला म्हणाले की, तुमच्या वडीलांची घरकुलची फाईलमध्ये काही त्रुटी न काढता पंचायत समीती कार्यालयास पाठवायची असेल तर तु मला 10,000/- रूपये दे तुम्ही पैसे दिले नाही तर तुमच्या घरकुल फाईलमध्ये त्रुटी काढुन वर ऑफिसला पाठविणार नाही. ग्रामसेवक श्री.गायकवाड असे म्हटल्याने मी त्यांना नाईलाजास्तव हो म्हणुन उद्या येवुन भेटतो असे सांगितले. त्यावेळी ग्रामसेवक श्री.गायकवाड यांनी मी उद्या पंचायत समीती गंगापुर कार्यालयात मिटींगला जाणार असल्याने मी गावात येणार नाही. तु मला तेथेच येवुन भेट असे म्हटल्याने मी त्यांना हो म्हणुन तेथुन निघुन आलो.

ग्रामसेवक श्री.गायकवाड यांना मला लाच देण्याची इच्छा नाही. माझी त्यांचेशी वैयक्तीक दुश्मनी नाही तसेच त्यांचा आणि माझा देण्या घेण्याचा किंवा उसणवारीचा कोणत्याही प्रकारचा व्यवहार नाही. ते मागणी करत असलेले 10,000/- रुपये हे लाच म्हणुन मागत असल्याची मला पुर्ण खात्री झाली आहे. ग्रामसेवक श्री.गायकवाड यांना मी दहा हजार रुपये दिले नाही. तर ते माझ्या वडीलांचे घरकुलाचे फाईलमध्ये त्रुटी काढुन वरच्या ऑफिसला पाठविणार नाही. असे त्यांनी यापुर्वी सांगितले आहे. तरी ग्रामसेवक श्री.गायकवाड यांनी सांगितल्या प्रमाणे त्यांना आज दिनांक 18/09/2023 रोजी पंचायत समीती कार्यालय गंगापुर येथे जावुन घरकुल फाईल कामाबाबत प्रत्यक्ष भेटुन मी बोलणार आहे. मी लाच म्हणुन देण्यासाठी 10,000/- रुपये सोबत आणले आहे. तरी सदर बाबत पडताळणी करुन ग्रामसेवक श्री.गायकवाड यांनी स्वत: किंवा ईतरांमार्फत लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम स्विकारल्यावर त्यांना पकडुन त्यांच्यावर योग्य ती कायदेशिर कारवाई करावी हि विनंती."अशा मजकुराची तक्रार दिली त्या वरुन पोलीस निरीक्षक श्री. साळुंखे यांनी लॅपटॉपवर टाईप करुन घेतली.

मी तक्रार दिल्या नंतर पोलीस निरीक्षक श्री. साळुंखे यांनी तक्रारीची प्रिंट काढुन पंचांना तक्रार दाखवली. पंचानी तक्रार वाचुन माझ्या समक्ष तक्रारीवर सहया केल्या. त्यानंतर श्री गायकवाड यांची भेट घेण्याचे ठरविले. त्यानंतर श्री साळुंखे यांच्या सुचनेवरुन पंचायत समिती गंगापुर तेथे जावुन व्हाईस रेकॉर्डच्या सहाय्याने पंचासमक्ष ग्रामसेवक श्री. गायकवाड यांची लाचेच्या मागणीची पडताळणी करुन खात्री करण्याचे ठरविले.

पोलीस निरिक्षक श्री. साळुंखे यांचे सुचने प्रमाणे ग्रामसेवक श्री. गायकवाड यांची लाचेच्या मागणीची पडताळणी करीता व्हाईस रेकॉर्डर मला दाखविला व त्यांनी पंचासमक्ष त्यामध्ये नविन मेमरी कार्ड टाकले व त्यानंतर मेमरी कार्डला फॉरमॅट करुन संभाषण कसे रेकॉर्ड केले जाते या बाबत पंचाना व मला माहीती दिली व सदर व्हाईस रेकॉर्डर सुरू करुन एका दोरीच्या सह्याने माझे गळयात अडकवुन शर्टचे आत ठेवला. त्यानंतर मी व पंच क्र. 1 श्री. वाघ याना माझ्या मोटारसायकलवर बसवुन पंचायत समिती गंगापुर येथे गेलो. त्या ठिकाणी श्री. गायकवाड यांना मोबाईलद्वारे संपर्क केला असता मी मीटींगमध्ये आहे दहा मिनीटात मिटींग सुटेल तुम्ही थांबा असे सांगितले. त्यानंतर काही वेळाने श्री. गायकवाड बाहेर आले त्यावेळी मी त्यांची भेट घेतली. तेव्हा आमच्या दोघांमध्ये घरकुलच्या फाईलबद्दल कामासंदर्भात बोलणे झाले. त्यावेळी श्री. गायकवाड यांनी माझ्याकडे पंचासमक्ष तडजोडीअंती 8000/- रुपये लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम दिनांक 20/09/2023 रोजी औरंगाबाद येथे फोन करून स्वीकारण्याचे मान्य केले.

त्यानंतर मी व पंच क्र.1 असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. तेव्हा पो.अ. गुसिंगे यांनी माझ्या कडील व्हाईस रेकॉर्डर घेऊन बंद करून पो.नि. श्री. साळुंखे यांच्या ताब्यात दिला. त्यानंतर त्यात रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले. पो.नि.श्री.साळुंखे यांना श्री गायकवाड हे आठ हजार रुपये लाचेची मागणी करत असल्याची खात्री झाल्याने त्यंाना दिनांक 20/09/2023 रोजी लाच स्विकारतांना प्रत्यक्ष पकडण्याचे ठरविले. त्यानंतर मला, सापळा पथकातील सदस्य व पंचाना गोपनीयतेच्या सुचना देवुन आम्हाला दिनांक 20/09/2023 रोजी हजर राहण्याचे सांगीतले. तसेच मला येताना लाचेची रक्कम देण्यासाठी आठ हजार रुपये देखील सोबत आणण्याचे सांगीतले. त्याप्रमाणे मी पंच तसेच सापळा पथकाचे सदस्य असे दिनांक 20/09/2023 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालय येथे हजर आलो. त्यांतर मी श्री.गायकवाड यांना मोबाईलद्वारे संपर्क केला असता त्यांनी मी तुम्हाला चार, पाच वाजता फोन करतो त्यानंतर भेटु असे सांगितले. त्यानंतर श्री साळुंखे यांचे सुचने वरुन मी माझ्या कडील पाचशे रुपये 500/- दराच्या 16 नोटा असे एकुण आठ हजार रुपये ताब्यात घेवुन श्री.साळुंखे यांच्याकडे दिले. त्यानंतर साळुंखे यांचे कक्षामध्ये पंचासमक्ष अंन्थ्रासिन पावडरचे प्रात्यक्षीक करुन दाखवीले. तसेच पंचाना व मला सुचना दिल्या की, अंन्थ्रासिन पावडर लावलेली लाचेची रक्कम श्री.गायकवाड यांनी स्विकारल्या नंतर डाव्या हाताने डोक्यावरील टोपी काढुन डाव्या हातात धरण्यास सांगितले. सदर नोटा माझ्या पॅन्टचे उजवे खिशात ठेवले व उजव्या हाताने काढुन ग्रामसेवक श्री. गायकवाड यांना देण्यास सांगीतले. त्यानंतर ग्रामसेवक श्री. गायकवाड यांचा फोन न आल्यामुळे मी त्यांना फोनद्वारे संपर्क साधला असता, श्री. गायकवाड यांनी मला वरद गणेश मंदीर, समर्थनगर, येथे येण्यास सांगितले. त्यानंतर आम्ही सर्व अँन्टी करप्शन कार्यालय येथुन निघुन सिध्दार्थ गार्डनसमोरील एका सुरक्षीत ठिकाणी हजर आलो. त्यानंतर मला साळुंखे साहेबांनी पुन्हा थोडक्यात सुचना देवुन व्हाईस रेकॉर्डर सुरू करुन माझे गळयात अडकवुन शर्टचे आत ठेवला. तेव्हा मी श्री. गायकवाड साहेबांना फोन करुन वरद गणपती येथे आल्याबाबत कळविले. सापळा पथकातील सर्वजन एकमेकांना दिसतील अशा रितीने वरद गणेश मंदीर, समर्थनगर समोरील परिसरात थांबले.

त्यानंतर मी व पंच क्र.1 श्री. वाघ असे श्री गायकवाड यांची भेट घेतली तेव्हा श्री. गायकवाड मला चहा घेऊ असे म्हणाल्याने मी व पंच श्री. वाघ असे श्री. गायकवाड यांचे सोबत वरद गणेश मंदीरा समोरील रोडवरील एका चहाच्या टपरीवर चहा घेण्यासाठी आलो. तेव्हा सापळा पथक ही आमचे मागे-मागे कोणाला दिसणार नाही. अशा रितीने थांबले.माझी श्री. गायकवाड साहेबांसोबत कामासंदर्भाने चर्चा झाली. तेव्हा श्री.गायकवाड साहेब म्हणाले की, दोन पैशे टाकावे लागता, त्याच्या शिवाय नई काम होत नाही तेव्हा मी त्यांना म्हणालो की, जेवढं लवकर होईल तेवढं तुमच्या पध्दीतनं करा असे म्हणुन मी माझ्या पॅन्टचे उजव्या खिश्यातुन लाचेची रक्कम आठ हजार काढुन त्यांच्या समोर धरले असता त्यांनी उजव्या हाताने आठ हजार रुपयचे स्वीकारुन दोन्ही हाताने मोजुन त्यांच्या उजव्या पँट च्या खिशात ठेवले.ती वेळ अंदाजे सायंकाळी साडेसहा वाजेची सुमाराची होती. त्यानंतर मी सापळा पथकास दिसेल अशा रितीने पुर्व नियोजीत ईशारा केला. तेव्हा सापळा पथक तात्काळ सदर ठिकाणी आले. श्री. गुसिंगे यांनी माझ्या कडील व्हाईस रेकॉर्डर घेऊन बंद केला. त्यावेळी पोलीस निरीक्षक श्री.साळुंखे यांनी श्री.गायकवाड यांना स्वतः व पंचाची, सापळा पथकाची ओळख करुन दिली. श्री. गायकवाड यांना त्यांचे नाव, गाव विचारले असता त्यांनी त्यांचे पुर्ण नाव श्री. दिलीप गमजु गायकवाड वय 43 वर्षे व्यवसाय नोकरी, ग्रामसेवक रा. प्लॉट नंबर 5 फ्लॅट नं. 50 सरस्वती अपार्टमेंट, समर्थनगर, औरंगाबाद असे सांगितले. त्यानंतर त्यांची पंचासमक्ष त्यांना अंन्थ्रासिन पावडर लागलेले आठ हजार रुपये लाचेची रक्कम बाबत विचारले असता त्यांनी त्यांच्या पँटच्या उजव्या बाजुचे खिशात ठेवल्याचे सांगीतले. त्यानंतर पंच क्रमांक 2 गव्हाणे यांनी श्री. गायकवाड यांचे पँटचे उजव्या बाजुचे खिशातुन लाचेची रक्कम आठ हजार रुपये काढुन श्री.साळुंखे यांच्या सुचनेप्रमाणे त्यांचे ताब्यात ठेवले.त्यानंतर तेथेचे काळया कपडयाचे सहाय्याने अंधार करुन पंचासमक्ष निळया रंगाच्या लाईटचे बॅटरीने पाहणी केली असता सदर नोटांवर व

श्री. गायकवाड यांचे दोन्ही हाताचे बोटांना तसेच पँटच्या उजवे बाजुचे खिश्यामध्ये आतील बाजुस व ठिक ठिकाणी अंन्थ्रासिन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर श्री.गायकवाड यांना ताब्यात घेतले. त्याबाबतचा तसा सविस्तर पंचनामा सापळा पथकाने केला.

तरी दिनांक 20/09/2023 रोजी साडेसहा वाजेच्या सुमारास श्री. दिलीप गमजु गायकवाड वय 43 वर्षे व्यवसाय नोकरी, ग्रामसेवक रा. प्लॉट नंबर 5 फ्लॅट नं. 50 सरस्वती अपार्टमेंट, समर्थनगर,औरंगाबाद यांनी माझ्याकडे माझे वडीलांचे नावाची रमाई आवास योजने अंतर्गत घरकुल मंजुर होणे बाबतची फाईलमध्ये त्रुटी न काढण्यासाठी व ती कामाची फाईल पंचायत समिती ऑफिसला पाठविण्याकरिता पहिले 10,000/-रुपयांची लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 8,000/- रुपये वरद गणेश मंदीरा समोरील रोडवरील एका चहाच्या टपरीवर ग्रामसेवक श्री. गायकवाड यांनी स्वत: स्विकारले असता पंचा समक्ष सापळा पथकाने जागीच पकडले आहे. तरी श्री.गायकवाड यांचे विरुध्द कायदेशिर कारवाई करावी हि विनंती.

मी दिलेली फिर्याद संगणकावर टंकलिखीत करण्यात आली असुन ती मी वाचुन पाहिली माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष ही फिर्याद दिली सही

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

SANTOSH ASHOK PATIL(I (Inspector)) / POBN45678 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपासी अधिका-याचे नाव):
पोनि सचिन साकळे, ॲन्टी करप्शन ब्युरो औरंगाबाद

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

कर्तव्य अधिकारी
पोलीस ठाणे क्रांतीचौक
औरंगाबाद शहर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** SANTOSH ASHOK PA
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN45678